मुंबई । कांदिवली पोईसर जिमखान्याच्या वतीने "बालदिन उत्सव २०२५" चा भव्य समारंभ आयोजित करण्यात आला होता. उत्तर मुंबईचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी विशेष उपस्थिती लावली आणि मुलांना, त्यांच्या पालकांना आणि उपस्थित नागरिकांना संबोधित केले. याप्रसंगी पोईसर जिमखान्याचे अध्यक्ष मुकेश भंडारी, सामाजिक कार्यकर्ते गोपाळ शेट्टी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



## राज्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा

# खरडलेल्या शेतजमिनीसाठी मिळणार माती, गाळ, मुरुम मोफत; पूरग्रस्त जमिनीसाठी गौण खनिज रॉयल्टी माफ

प्रतिनिधी
■ मुंबई

अतिवृष्टी आणि पुरामुळं खरडून गेलेल्या शेतजमिनीला पूर्वस्थितीत आणण्यासाठी लागणारी माती, गाळ, मुरुम मोफत पुरवण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलाय. याबाबतचं परिपत्रक महसूलविभागानं शुक्रवारी जारी केलं. यामुळं नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

राज्यात झालेल्या मुसळधार पावसामुळं शेतीचं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्यांची जमीन पुन्हा लागवडी योग्य व सुपीक करण्यासाठी लागणाऱ्या माती, गाळ, मुरूम या



गौण खनिजांवरील स्वामित्वधन (रॉयल्टी) माफीच्या निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे सक्त आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

राज्याच्या अनेक भागात अतिवृष्टी आणि पूरस्थिती निर्माण झाल्यानं शेतपिकांचं नुकसान झालय. शिवाय, मनुष्य व पशुहानी यासह शेतजमीन खरडून जाणं, अतिरिक्त गाळ साठणं आणि जमिनीचा सुपीकस्तर वाहून जाण्याच्या घटना घडल्या. अशा जमिनी पडीक झाल्या असून, त्यांना पुन्हा लागवडीयोग्य करण्यासाठी शेतकऱ्यांना गौण खनिजांची आवश्यकता असते.

"नैसर्गिक आपत्तीग्रस्त व्यक्तींना घर, गुरांचा गोठा, शेत आणि विहीर यासाठी आवश्यक पाच ब्रास गौण खनिजाच्या वापरासाठी स्वामित्वधनातून सूट मिळेल. शेतकऱ्यांच्या हितासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे," अशी माहिती महसूल चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

पुण्याजवळ ताथवडे येथील शासकीय मालकीच्या जमिनीची खरेदी-विक्री करताना नियमांचे गंभीर उल्लंघन केल्याप्रकरणी पुण्यातील हवेली सह दुय्यम निबंधक कार्यालयातील प्रभारी सहदुय्यम निबंधक विद्या शंकर बडे (सांगळे) यांना निलंबित करण्यात आलं. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नोंदणी महानिरीक्षकाना याबाबत कारवाई करण्याचे आदेश दिले.

पुण्याजवळील मौजे ताथवडे (ता. मुळशी) येथील सर्व्हे क्र. 20 मधील एकूण 6 हे 32 आर जमिनीच्या खरेदीखत नोंदणीत ही अनियमितता झाली आहे. या जमिनीवर पशुसंवर्धन आयुक्तांचा ताबा असून, शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय खरेदी-विक्रीस बंदी असलेली मालमत्ता आहे. दस्त नोंदणीच्यावेळी बडे यांनी अद्ययावत किंवा नजिकच्या कालावधीतील सातबारा उतारा जोडण्याची बाब दुर्लक्षित केली. त्यांनी जुना सातबारा स्वीकारला. जर त्यांनी दस्त नोंदणीच्या तारखेस लागू असलेला सातबारा तपासला असता, तर त्यावर 'शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय खरेदी-विक्रीस बंदी' हा प्रतिबंधात्मक शेरा दिसला असता आणि दस्त नोंदणी नाकारता आली असती.

# 'बेस्ट'च्या सकारात्मक प्रस्तावानंतर शशांक राव यांचे उपोषण मागे




प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्ट उपक्रमातील कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्काच्या मागण्या पूर्ण व्हाव्यात याकरिता बेस्ट वर्कर्स युनियन आणि संघर्ष कामगार कर्मचारी युनियन या संघटनेचे सरचिटणीस, शशांक राव यांनी १०.११.२०२५ रोजी सुरू केलेले बेमुदत उपोषणाचे आंदोलन बेस्ट उपक्रमाकडून सकारात्मक प्रस्ताव आल्याने १३ नोव्हेंबर रोजी रात्री ८.१५ वा. मागे घेतले आहे.

बेस्ट प्रशासन व युनियन यांच्या झालेल्या संयुक्त बैठकीत सर्व मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा झाली व यापुढे या मागण्यां संदर्भात सातत्याने चर्चा करून तीन महिन्याच्या आत वरील नमूद सर्व मागण्यां संदर्भात निर्णय घेण्यात येईल असे ठरले. बेस्ट उपक्रमाने स्वमालकीच्या ३,३३७ बसगाड्या कायमस्वरूपी राखाव्यात, बेस्ट उपक्रमात सेवा करून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युइटीची थकित रक्कम त्यांना तातडीने देण्यात यावी, बेस्ट कर्मचाऱ्यांच्या सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसी व महापालिका समकक्ष वेतनमान याचा समावेश असलेला प्रलंबित वेतनकरार तातडीने करण्यात यावा, बेस्ट उपक्रमाशी संबंधित "क" अर्थ संकल्पाचे विलीनीकरण मुंबई महापालिकेच्या "अ" अर्थसंकल्पात करण्यात यावे , बेस्ट उपक्रमाच्या विद्युत पुरवठा विभागात २०१० व २०२४ व तद्नंतर कायम करण्यात आलेल्या कॅज्युअल लेबर (CL) कामगारांना ते सेवेत दाखल झालेल्या प्रथम दिवसापासून पूर्वलक्षी प्रभावाने नोकरीत कायम असल्याचे मानून सुधारित वेतनश्रेणी निश्चित करण्याबाबत आणि खाजगी कंपन्यांमार्फत चालविण्यात येणाऱ्या बेस्ट उपक्रमाच्या बसगाड्यांवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना समान कामाला, समान दाम तातडीने देण्यात यावे, या करिता संघटनेचे सरचिटणीस, शशांक राव यांनी १०.११.२०२५ रोजी बेमुदत उपोषणाचे आंदोलन सुरू केले होते. बेस्ट उपक्रमाकडून सकारात्मक प्रस्ताव आल्याने १३ नोव्हेंबर रोजी रात्री ८.१५ वा. मागे घेतले. असे शशांक राव यांच्या संघटनेकडून सांगण्यात आले.

बेस्ट उपक्रमाने दिलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने काल १४ नोव्हेंबर रोजी बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक, डॉ. सोनिया सेठी यांच्या सोबत बेस्ट वर्कर्स युनियन आणि संघर्ष कामगार कर्मचारी युनियनच्या पदाधिकाऱ्यांची संघटनेने केलेल्या कामगारांच्या मागण्यांबद्दल पहिली बैठक पार पडली. या बैठकीत बेस्ट उपक्रमाच्या महाव्यवस्थापक डॉ. सोनिया सेठी व बेस्ट उपक्रमातील वरिष्ठ अधिकारी आणि मुंबई महानगरपालिकेचे उपआयुक्त प्रशांत गायकवाड हे उपस्थित होते तसेच बेस्ट वर्कर्स युनियन संघर्ष कामगार कर्मचारी युनियन तर्फे संघटनेचे सरचिटणीस, शशांक राव व वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

## घाटकोपरमध्ये रस्ता रुंदीकरणासाठी 24 बांधकामांवर हातोडा



मुंबई: घाटकोपर येथील झुणझुणवाला महाविद्यालय ते अंधेरी-घाटकोपर जोड मार्गाच्या (एजीएलआर) रुंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या २४ बांधकामांचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'एन' विभाग कार्यालयाच्या वतीने गुरुवारी निष्कासन करण्यात आले. तसेच, या जोड मार्गावरील नवीन उड्डाणपुलाच्या बांधकामामुळे बाधित होणाऱ्या ३५ बांधकामांच्या निष्कासनाची कारवाई प्रगतिपथावर आहे. असे पालिकेच्यावतीने सांगण्यात आले. पालिकेच्या वतीने घाटकोपर (पश्चिम) येथील रेल्वे स्थानकाला समांतर असलेल्या झुणझुणवाला महाविद्यालय ते अंधेरी-घाटकोपर जोड मार्गादरम्यान १५.२५ मीटर रुंदीचा विकास नियोजित रस्ता बनवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या रुंदीकरणाच्या कामात रस्त्यालगत असलेल्या काही बांधकामांमुळे अडथळा निर्माण झाला होता. या रस्त्याच्या बांधकामामुळे बाधित झालेल्या २४ बांधकामांचे आज निष्कासन करण्यात आले. तसेच, याच परिसरात महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमआरआयडीसी) यांच्याकडून नवीन रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू आहे. या उड्डाणपुलाच्या बांधकामादरम्यान बाधित होणाऱ्या ३५ बांधकामांचे निष्कासन करण्याची कारवाईदेखील प्रगतिपथावर आहे. या दोन्ही प्रकल्पाच्या कामकाजात अडथळा ठरणाऱ्या मालमत्ताधारकांना रितसर सूचना देऊन तसेच नुकसानभरपाई देऊन त्यानंतर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

# रिसायकलिंग हेच भविष्य आणि खऱ्या अर्थाने चक्रीय अर्थव्यवस्थेचा पाया - सिद्धेश कदम

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र पर्यावरणाच्या नेतृत्वात नेहमीच अग्रेसर राहिला आहे, एकल-वापर प्लॅस्टिकवर बंदी लागू करणारे हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे. रिसायकलिंग हेच भविष्य आहे आणि खऱ्या अर्थाने चक्रीय अर्थव्यवस्थेचा पाया असल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्डचे अध्यक्ष सिद्धेश कदम म्हणाले. प्लास्टिक्स रिसायकलिंग शो इंडियासह भारत रिसायकलिंग शो या तीन दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.



ते पुढे म्हणाले महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्ड, राज्य आणि केंद्र सरकारांच्या भागीदारीत, रिसायकलिंग आणि संसाधन व्यवस्थापनातील युवा-नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना पाठिंबा देण्यासाठी इनक्यूबेशन हब विकसित करत आहे.प्लॅस्टिक्स रिसायकलिंग शो इंडिया यासह भारत रिसायकलिंग शो 2025 चे पहिले प्रदर्शन आज मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये सुरू झाले. मीडिया फ्युजन आणि क्रेन कम्युनिकेशन्स यांनी आयोजित केलेले हे देशातील सर्वात मोठे रिसायकलिंग-केंद्रित मंच आहेत. या शोमध्ये १५० प्रदर्शक, १० ००० अभ्यागत आणि १० हून अधिक देशांतील सहभागींनी हजेरी लावली, ज्यांनी रिसायकलिंग तंत्रज्ञान, उपाय आणि नवकल्पनांचे सर्वसमावेशक प्रदर्शन केले. रीजनल सेंटर फॉर अर्बन एंड एनवायरनमेंटल स्टडीज़ चे निदेशक अजित साळवी म्हणाले "रिसायकलिंग उद्योगात भारताच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनण्याची अफाट क्षमता आहे. विकसित भारत २०४७ ची राष्ट्राची संकल्पना, रिसायकलिंग क्षेत्राच्या सक्रिय सहभाग आणि प्रगतीशिवाय साकार होऊ शकत नाही. इको रिसायकलिंगचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक बी के सोनी यावेळी म्हणाले, "आज, भारतात केवळ सुमारे ५ % ई-कचरा रिसायकल केला जात आहे, ज्याला अंदाजे ₹२ ,५०० कोटींच्या गुंतवणुकीचा आधार आहे. पूर्ण-प्रमाणात रिसायकलिंग साध्य करण्यासाठी, या क्षेत्राला जवळपास ₹५० ,००० कोटी (सुमारे ६ अब्ज डॉलर्स) ची आवश्यकता असेल, जो एक प्रचंड गुंतवणुकीचा संधी आहे. यावेळी ताहेर पात्रावाला, व्यवस्थापकीय संचालक, मीडिया फ्युजन म्हणाले कि, "शाश्वतता आणि चक्रीय अर्थव्यवस्था अग्रभागी असताना, या वर्षीच्या भारत रिसायकलिंग शो (BRS) सारख्या उपक्रमांमुळे भारताच्या रिसायकलिंग इकोसिस्टममध्ये संवाद, नवकल्पना आणि कृतीसाठी एक मजबूत व्यासपीठ तयार करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळ मिळते.



मुंबई । स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त, बृहन्मुंबई महानगरपालिका सभागृहातील पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अर्धपुतळयास महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने उप आयुक्त (सुधार) संजोग कबरे यांनी काल पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. महानगरपालिका सचिव मंजिरी देशपांडे यावेळी उपस्थित होत्या.


**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र. :- का. अ. (शहर) / मुं.झो.सु.मंडळ/ई-निविदा/ ६८/२५-२६**

कार्यकारी अभियंता [शहर] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३९, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४८४) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण ०६ कामाकरीता बी - १ (टक्केवारी) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई-निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ http://mahatenders.gov.in, वर उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक १७.११.२०२५ सकाळी ०१.०० पासून दिनांक २४.११.२०२५ सायंकाळी ५.३५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त http://mahatenders.gov.in, संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर) / मुं. झो.सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

CPRO/A/960
Follow us:@mhadaofficial
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

सही/-
कार्यकारी अभियंता (शहर),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई



**एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड**
सीआयएन: एल२७१००एमएच१९८५पीएलसी०३५२६८
२८/३०, अनंत वाडी, बिनानी भवन, तळ मजला, भूलेश्वर, मुंबई ४००००२ ई-मेल : spvglobaltrading@gmail.com संकेतस्थळ: www. spvglobal.in

**३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा**

(रु. लाखामध्ये)

| अनु. क्र. | तपशिल | एकमेव | | | | | एकत्रिकृत | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेले त्रैमासिक | संपलेले त्रैमासिक गत वर्ष | संपलेले ६ महिने | संपलेले ६ महिने गत वर्ष | संपलेले गत वर्ष | संपलेले त्रैमासिक | संपलेले त्रैमासिक गत वर्ष | संपलेले ६ महिने | संपलेले ६ महिने गत वर्ष | संपलेले गत वर्ष |
| | | ३० सप्टे २५ | ३० सप्टे २४ | ३० सप्टे २५ | ३० सप्टे २४ | ३१ मार्च २५ | ३० सप्टे २५ | ३० सप्टे २४ | ३० सप्टे २५ | ३० सप्टे २४ | ३१ मार्च २५ |
| 1. | कार्यामधून एकूण उत्पन्न (निव्वळ) | १.१९ | २,०४८.८८ | २.४० | २,३२२.९८ | २,४०५.५० | २७,३५५.७४ | २४,३७७.७१ | ५२,०२८.११ | ४६,८३९.६८ | ९१,९९२.३२ |
| 2. | सामान्य कार्यामधून कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व) | (४.७८) | २९.३५ | (४०.७३) | १३.६१ | (२.९३) | २७,३५५.७४ | २४,३७७.७१ | ५२,०२८.११ | ४६,८३९.६८ | ९१,९९२.३२ |
| 3. | कर पूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व) | (४.७८) | २९.३५ | (४०.७३) | १३.६१ | (२.९३) | २७,३५५.७४ | २४,३७७.७१ | ५२,०२८.११ | ४६,८३९.६८ | ९१,९९२.३२ |
| 4. | कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व) | (३.५६) | २५.९२ | (३०.४३) | १०.१८ | (२.१९) | १,०२४.२७ | (२२७.८०) | १,४२१.१७ | ८४६.९७ | २,६५३.८३ |
| 5 | कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न (एकत्रित नफा/ (तोटा)) | ३.६९ | २५.८५ | (३०.२५) | १०.२० | २.३४ | १,०२४.१४ | (२२७.८५) | १,४२१.२५ | ८४६.९९ | २,६११.१५ |
| 6 | सम भाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रती समभाग) | १९६.०० | १९६.०० | १९६.०० | १९६.०० | १९६.०० | १९६.०० | १९६.०० | १९६.०० | १९६.०० | १९६.०० |
| 7 | राखीव (गत वर्षाच्या लेखापरीक्षित शिलकीच्या ताळेबंदामध्ये नमूद केल्यानुसार (पुनर्मुल्यांकित राखीव वगळता) | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 8 | प्रती समभाग उत्पन्न (अतिविशिष्ट बाबी नंतर) | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | (ए) मूळ आणि सौम्यीकृत | (०.१८)* | १.३२* | (१.५५)* | ०.५२* | (०.११) | २८.६१* | (३.३४)* | ३९.११* | २३.९६* | ७४.२८ |

Notes :*not annualised

1. वरील अलिखित आर्थिक परिणामांचे पुनरावलोकन ऑडिट समितीने केले आहे आणि शिफारस केली आहे आणि १३ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत मंडळाने मंजूर केले आहे. वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील निकालांचे मर्यादित पुनरावलोकन केले आहे. एक अपात्र मत जारी केले आहे. त्यावर त्यांच्याद्वारे ३० जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध वर्षाच्या आर्थिक निकालाचे संपूर्ण स्वरूप www.bseindia.com आणि www.spvglobal.in वर उपलब्ध आहे.

ठिकाण: मुंबई
दिनांकित: १३ नोव्हेंबर २०२५

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड करीता
सही/-
बाळकृष्ण बिनानी
व्यवस्थापकीय संचालक डीआयएन: ००१७५०८०



महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई–निविदा सूचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कंपनीच्या वागळे ईस्टेट विभागीय कार्यालयांतर्गत विविध कार्यालय आणि उपकेंद्रातील साफ सफाईच्या काम करणेसाठी ई– निविदा क्र. EE/WE/E-Tender/T-07/2025-26 महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळावर दि. १२.११.२०२५ पासून उपलब्ध आहे.

संपर्क – अतिरिक्त कार्यकारी अभियंता, दूरध्वनी क्र ८८७९०४३०९४, एम.एस.इ.डी.सी.एल., वागळे ईस्टेट विभागीय कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, वागळे ईस्टेट, ठाणे(प.) ई–मेल eewagleestate@gmail.com

PRO NO.253/13.11.2025

कार्यकारी अभियंता
स.व सु. वागळे ईस्टेट विभाग



**मध्य रेल्वे**

**शुद्धिपत्रक**

सदर वृत्तपत्रामध्ये दि. ०९ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या ई-निविदा सूचना क्र. निमासू/०१/२५/४९ दिनांकित ०६ नोव्हेंबर मधील मजकूर खालील प्रमाणे वाचवा.

| निविदा क्र. | वर्णन | परिमाण | देय दिनक |
|---|---|---|---|
| १०२५१४८० | ग्लास फायबर बॅग फिल्टर | ५३१ नग | २४/११/२०२५ |
| ४२२५१००६ | अक्सल बॉक्स हाऊसिंग | ३५५ नग | २५/११/२०२५ |
| ५१२५६०५९ | ६० किग्रॅ [९० यूटीएस] रेल्स च्या फ्युजन वेल्डिंगसाठी वेल्डिंग पोर्शनचे उत्पादन आणि पुरवठा | ४५००० नग | २४/११२०२५ |

रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है Sai/629



**REMSONS INDUSTRIES LIMITED**
सीआयएन: एल५११९००एमएच१९७१पीएलसी०१५१४१
नोंदणी. कार्यालय: ४०१, ४ था मजला, ग्लॅडोलिया हनुमान रोड, विले पार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७. दूर. क्र.: ०२२-३५०१६४००.
ई – मेल आयडी: corporate@remsons.com, संकेतस्थळ: www.remsons.com

**३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि सहा महिन्यांसाठी अ-लेखापरीक्षित एकमेव आणि एकत्रिकृत वित्तिय निष्कर्षाचा आराखडा**

रु. लाखामध्ये (ईपीएस वगळता)

| तपशिल | एकमेव | | | | | | एकत्रिकृत | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले अर्ध वर्ष | | संपलेले वर्ष | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले नऊ महिने | | संपलेले वर्ष |
| | ३० सप्टे २०२५ (अलेखापरीक्षित) | ३० जून २०२५ (अलेखापरीक्षित) | ३० सप्टे २०२४ (अलेखापरीक्षित) | ३० सप्टे २०२५ (अलेखापरीक्षित) | ३० सप्टे २०२४ (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२५ (लेखापरीक्षित) | ३० सप्टे २०२५ (अलेखापरीक्षित) | ३० जून २०२५ (अलेखापरीक्षित) | ३० सप्टे २०२४ (अलेखापरीक्षित) | ३० सप्टे २०२५ (अलेखापरीक्षित) | ३० सप्टे २०२४ (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२५ (लेखापरीक्षित) |
| कार्यामधून एकूण उत्पन्न (निव्वळ) | ८,२६५.२० | ६,७७५.६५ | ७,४६०.७५ | १५,०४०.८५ | १३,६६५.०१ | २८,१९४.०४ | ११,६४५.३३ | १०,०८०.६५ | ९,२९१.३३ | २१,७२५.९८ | १७,०१०.७४ | ३७,९८५.६९ |
| कर पूर्व सामान्य कार्यामधून निव्वळ नफा/ (तोटा), अपवादात्मक आणि / किंवा अपवादात्मक बाबी | ३७१.७० | २७३.५० | ५०१.३६ | ६४५.१८ | ७१९.९९ | १,४११.२४ | ८१८.०६ | ६०६.६८ | ४१८.५३ | १,४२४.७४ | ६९६.८१ | २,२५५.४५ |
| कर पूर्व कालावधीसाठी अपवादात्मक बाबी पश्चात सामान्य कार्यामधून निव्वळ नफा/ (तोटा) | ३७१.७० | २७३.५० | ५०१.३६ | ६४५.१८ | ८१०.१८ | १५०१.४३ | ८१८.०६ | ६०६.६८ | ४१८.५३ | १,४२४.७४ | ७८७.०० | २,२४४.७९ |
| कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक बाबी पश्चात ) | २७६.०५ | २०२.१८ | ३६४.४ | ४७८.२१ | ५९१.३३ | १,१०७.८४ | ६३९.३९ | ४७९.८६ | २९८.७३ | १,११९.२५ | ५६७.२५ | १,६९६.२४ |
| *कालावाधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीसाठी एकत्रित नफा/ (तोटा) (कर पश्चात) आणि अन्य एकत्रित उत्पन्न (कर पश्चात)] | ३१०.२२३ | १९८.९३ | ३६१.५२ | ५०९.१५ | २५२.२५ | ७९२.८५ | ४६६.४४ | ६२२.७८ | ४१२.१७ | १,०८९.९० | ७५८.२६ | १,५३७.०२ |
| भरणा केलेले समभाग भांडवल (रु. १०/- दर्शनी मूल्याचे) | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ |
| राखीव (हिशोबाच्या गत वर्षाच्या ताळेबंदाच्या अनुसार पुंरामुल्यांकित राखीव) | ३१ मार्च २०२५ अनुसार | | | | | १०,५५६.८३ | | | | | | ११,८६३.५७ |
| " प्रति समभाग उत्पन्न (रु. १०/- प्रत्येकीचे) - १. मूळ : (रु.) | ०.७९ | ०.५८ | १.०४ | १.३७ | १.७० | ३.१८ | १.१६ | १.०४ | ०.९० | २.२१ | १.६७ | ४.१२ |
| २. सौम्यीकृत: (रु.)" | ०.७९ | ०.५८ | १.०४ | १.३७ | १.७० | ३.१८ | १.१६ | १.०४ | ०.९० | २.२१ | १.६७ | ४.१२ |

टिप:
१. वित्तिय निष्कर्षाचे लेखा परीक्षण समितीद्वारे समीक्षण करण्यात आले आहे आणि संचालक मंडळाद्वारे १४ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीमध्ये ते नोंदपटावर घेण्यात आले आहेत. वित्तिय निष्कर्ष कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३ आणि अन्य लागू असलेल्या लेखा परीक्षण आणि धोरण अंतर्गत विहित करण्यात आलेल्या भारतीय लेखा मानांकन (इंड – एएस) च्या अनुषंगाने तयार करण्यात आला आहे.
२. ३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि अर्ध वर्षासाठी अ-लेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा उपरोक्त हा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) तपशिलवार आराखडा आहे. संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांच्या कालावधीसाठीचा पूर्ण आराखडा कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.remsons.com आणि बीएसई लि. म्हणजेच www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) वर उपलब्ध आहे.

ठिकाण: मुंबई
दिनांकित: १४ नोव्हेंबर २०२५

रेमसन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करीता
सही/-
कृष्णा केजरीवाल
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन – ००५१३७८८)